**बोगस वैद्यकीय व्यवसायीकांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याबाबत..**

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन परिपत्रक क्र.सीआयएम.२०००/१३४८/प्र.क्र.१८३/२०००/अधिनियम
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १९ ऑगस्ट २०००

**वाचा :**

१) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांकःसीआयएम १०९१/सीआर १७२/ ९१ / एमइडी/अधिनियम दि. ५-९-१९९१

२) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक : सीआयएम-१०९९/प्रक्र३५५/ ९९ दिनांक ७-२-२०००

शासन परिपत्रक

**प्रस्तावना :-** राज्यात बोगस डॉक्टरांचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढत असल्याच्या ब-याच तक्रारी प्राप्त होत असून त्या अनुषंगाने वरचेवर विधानसभा/विधानपरिषदेत प्रश्न, लक्षवेधी सूचना उपस्थित करुन, बोगस वैद्यकीय व्यवसायिकांविरुध्द केलेल्या कारवाईबाबतची विचारणा केली जाते., अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणा-या वैद्यकीय व्यवसायिकांना शोधून काढण्यासाठी शा.नि. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. सीआयएम-१०९१/सी.१७२/९१ /एमआयडी-८ दिनांक ५-९-१९९१ अन्वये जिल्हास्तरिय, तालुकास्तरीय, महापालिकास्तरिय तसेच नगरपालिकास्तरिय अशा चार समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक :- सीआयएम १०९९/प्रक्र ३५५/९९ दिनांक ७-२-२००० अन्वये अन्वये बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर आळा घालण्यासाठी व त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी " जिल्हास्तरिय पुर्नविलोकन समिती " गठित करण्यात आल्या असून, सदर समितीच्या कार्यकक्षाही त्या शासन निर्णयाव्दारे ठरवुन देण्यात आलेला आहे. सदर समित्यांनी, बोगस वैद्यकीय व्यवसायिकांबाबतची माहिती पोलिसांना उपलब्ध करुन दिल्यानंतर, पोलीस यंत्रनेने महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ च्या कलम ३३ (२) व ३३-अे अन्वये संबंधितांविरुध्द न्यायालयात खटले दाखल करण्याची कार्यवाही करावयाची आहे.

२. महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम १९६१ च्या कलम ३३ (एक) नुसार वैद्यकीय व्यवसायिकांना संबधित वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार १) महाराष्ट्र वैद्यक परिषद, २) महाराष्ट्र समचिकित्सा परिषद, ३) महाराष्ट्र भारतीय चिकित्सा परिषद , ४) महाराष्ट्र दंतवैद्य परिषद या चार वैधानिक या परिषदांकडे राज्यात कार्यरत असणा-या वैद्यकिय व्यासायिकानी नोदंणीकरण करणे आवश्यक आहे. नोंदणीकृत वैद्यक व्यवसायिकांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस राज्यामध्ये वैद्यकिय व्यवसाय करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. सदर तरतुदीचा भंग करणा-यांविरुध्द त्या कायद्याच्या कलम ३३ (२) अन्वये प्रथम अपराध्यासाठी, अपराध सिध्दीनंतर १ ते ३ वर्षे इतका सश्रम कारावास अशी शिक्षा व रु. १००० ते रु. ५००० एवढा आर्थिक दंड विहित केलेला आहे. तसेच अपराध सिध्द झाल्यानंतरही वरील कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन संबंधितांकडून चालू राहिल्यास, त्यापुढील प्रत्येक दिवसासाठी ,प्रतिदिन रु. २००/- एवढया आर्थिक दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.

परत पावतीचे रजिस्टर पत्राचे
11 SEP 2000



93663

३.	वरील खुलाशावरुन हे स्पष्ट होईल की, ज्या वैद्यकीय व्यवसायीकांनी वैधकिय व्यवसायीक म्हणून महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम १९६१ च्या कलम ३३ (एक) नुसार वैद्यकीय परिषदेकडे, नोंदणी केलेली नाही असे वैद्यकीय व्यवसायीक बोगस वैद्यकीय व्यवसायीक ठरतात. अशा बोगस वैद्यकीय व्यावसायिकाविरुध्द, वरील कायद्याच्या कलम ३३(२) खाली कार्यवाही करण्याचे अधिकार पोलीस खात्याला, तसेच त्यासाठी स्थापन केलेल्या विविध समित्यांना, तसेच जिल्हा दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक जिल्हयात स्थापन केलेल्या, जिल्हास्तरिय पुनर्विलोकन समितीना, देण्यात आले आहेत. सदर समित्यानी बोगस डॉक्टरचा शोध घेऊन,याबाबतची माहिती पोलिस खात्याला दिल्यानंतर पोलिस खात्याने त्यांच्याविरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार खटले दाखल करण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनस्तरावरुन वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. सदर कामाला प्राधान्य देण्यासाठी संबंधित समित्यानी बोगस डॉक्टर शोधून काढण्याच्या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची अमंलबजावणी करण्यात यावी तसेच केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी समितीची दरमहा बैठक घेणे आवश्यक आहे.

४.	राज्यात बोगस डॉक्टरांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यांचे निर्मुलन करण्याच्यादृष्टीने, त्यांच्याविरुध्द करावयाच्या कारवाईबाबतची मार्गदर्शन तत्वे आखून देऊन, बोगस वैद्यकीय व्यवसायिकांविरुध्द, कडक कारवाई करण्याबाबत शासनाचे धोरण आहे. बोगस डॉक्टरांचा प्रश्न प्रत्येक अधिवेशनात प्रश्नांव्दारे व लक्षवेधी सूचनेव्दारे उपस्थित केला जात असल्याने, त्या अनुषंगाने ठोस कार्यवाही करण्याची निकड विचारात घेऊन, सदर प्रकरणी गठीत केलेल्या समित्यांनी, तसेच पोलीसांनी शिघ्र गतीने कार्यवाही करण्यासाठी खालीलप्रमाणे, मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात येत आहेत.

**मार्गदर्शक तत्वे :**

१)	बोगस डॉक्टरांची पडताळणी करण्याच्या दृष्टीने विविध स्तरावर गठित केलेल्या शासन निर्णय , वै.शि.व औ.द्र.वि. क्र. सीआयएम १०९१ सीआर १७२ एमईडी-८ दिनांक ४-१०-१९९१ अन्वये विविध स्तरावर गठित केलेल्या समित्यांनी, प्रत्येक महिन्यास सक्तीने सदर बोगस डॉक्टरांचा शोध घेणे आवश्यक आहे व त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा दंडाधिकारी तथा अध्यक्ष पुनर्विलोकन समिती यांच्यामार्फत या विभागास प्रतिमहिन्यास सादर करावा.

२)	महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम १९६१ च्या कलम ३३ (एक) नुसार नोंदणीकृत नसलेल्या व्यवसायीकांचे प्रमाणपत्र तपासून सदर प्रमाणपत्र संबंधित परिषदेकडे नोंद झाले की कसे याचा सदर समितीने शोध घेणे सक्तीचे आहे.

३)	सदर प्रमाणपत्र हे राज्यात कार्यरत असलेल्या विविध वैद्यकीय परिषदांच्या नियमानुसार, नोंदणीकृत आहे की कसे याबाबत संबंधित समितीने सविस्तर तपासणी करावयाची असून, त्यानुसार ते प्रमाणपत्र समितीला सदर अधिनियमाच्या तरतुदीनुसार न आढळल्यास, अशा बोगस वैद्यकीय व्यवसायीकांविरुध्द पोलीसांच्या मदतीने अधिनियमाच्या कलम ३३ (अे) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४)	अशी कारवाई करताना सदर व्यवसायीकांवर समितीकडून पोलीसांकडे प्रथम माहिती अहवाल दाखल करावा.

५)	समितीने प्रथम माहितीचा अहवाल पोलीसांकडे दाखल केल्यानंतर त्यांनी आवश्यक त्या तपासणीनुसार, विहित वैद्यकीय अधिनियमानुसार संबंधितांविरुध्द योग्य ती कार्यवाही जलद गतीने करावी.

६) सदर कार्यवाही नंतर भारतीय दंडविधान तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ च्या विहित तरतुदीनुसार, संबंधित न्यायालयाकडे तात्काळ खटला दाखल करावा. तसेच सदर प्रकरणे जलद गतीने निकाली निघण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक तो पाठपुरावा/सर्वतोपरी प्रयत्न करुन संबंधित बोगस वैद्यकीय व्यवसायिकांवर न्यायालयाच्या निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

७) अनेक बोगस वैद्यकीय व्यवसायिक प्रसिध्दी माध्यमाव्दारे "विशिष्ट रोगावर रामबाण उपाय "तसेच कोणत्याही 'दुर्धर रोग' निश्चितपणे बरा करण्याबाबत हमी देण्याबाबत, जाहीराती देतात. अशा व्यवसायीकांनी दिलेल्या औषधांची वैद्यकीय उपयुक्तता सिध्द झालेली नसते. असे असतानाही कित्येक फसव्या वैद्यकीय व्यवसायीकांकडून, वर नमूद केल्याप्रमाणे दिशाभूल करुन, लोकांची जाहिरातीव्दारे फसवणूक केली जाते. तथापि, औषधे आणि जादू टोना (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम १९५४ च्या तरतुदीनुसार, अशा जाहिराती देण्यावर पूर्णपणे बंदी आहे. असे असतानाही सदर अधिनियमांचे उल्लंघन करणा-यांविरध्द संबंधित समितीकडून आवश्यक ती कार्यवाही केली जात नसल्याचे आढळून आले आहे. तरी सदर समित्यानी अशा व्यक्तीविरुध्द त्यांच्यावर भारतीय दंडविधान तसेच औषधे आणि जादू (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम १९५४ च्या तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करावी.

८) तसेच मा.उच्चन्यायालय, मुंबई तसेच औरंगाबाद व नागपूर बेंच उच्चन्यायालय विहित याचिकेच्या प्रकरणामध्ये दिलेल्या न्याय निर्णयानुसार, महाराष्ट्र वैद्यकीय अधिनियम १९६१ च्या कलम ३७ अन्वये वैद्यकीय व्यवसाय करताना, या कलमातील तरतुदींचे अनुपालन करणे आवश्यक राहील. सदर कलमाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

अ) कोणत्याही व्यक्तीस, एखाद्या गावात कलम ३७(एक) तरतुदीनुसार नोंदलेल्या व्यवसायीकांने ज्या तारखेस सुरुवात केली असेल, त्या तारखेपूर्वी व्यवसायास सुरुवात केली असेल, आणि तो नियमितपणे तेथे व्यवसाय करीत असेल, अशा वैद्यकीय व्यवसायीकासच त्या गावात व्यवसाय करता येईल. याचाच अर्थ असा की,सदर कलमाच्या तरतुदीस अनुसरुन वैद्यकीय व्यवसाय करणा-या व्यक्तीने, त्याचा व्यवसाय सुरु करण्यापूर्वी, त्या गावात एकही नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी असता कामा नये.

ब) अशा व्यवसायीकास त्याचे व्यवसायीकाचे मुख्य ठिकाण, तो ज्या गावात व्यवसाय चालू ठेवेल, तोपर्यन्त त्याठिकाणी तो व्यवसाय करु शकेल.

९) होमिओपॅथी ही मान्यता प्राप्त वैद्यकिय चिकित्सा पध्दत आहे . या पध्दतीमधील पदवी / पदविका धारण करणा-या पदवीधारकांनी महाराष्ट्र समचिकित्सा परिषदेकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. मात्र इलेक्ट्रोपॅथी व इलेक्ट्रो-होमिओपॅथी या मान्यताप्राप्त चिकित्सा पध्दती नसल्याने व पर्यायाने या पध्दतीमधील अर्हताधारकांचे कोणत्याही वैद्यकिय परि्‌देकडे नोंदणी होवु शकत नसल्याने असे व्यवसायिक ते अनाधिकृत वैद्यकिय व्यवसायिक ठरतात.

५. यापुढे बोगस वैद्यकीय व्यावसायीक शोधून काढण्याच्या दृष्टीने कार्यरत असलेल्या विविध समित्यांनी, तसेच पोलीस विभागाने कठोरपणे कार्यवाही करुन, वरील मार्गदर्शक सुचनानुसार, बोगस डॉक्टरांची प्रकरणे शोधून काढून, त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ मधील कलम ३३ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कारवाई करावी. तसेच सदर समित्यांच्या बैठका नियमितपणे होत नसल्याचे आढळून आले आहे. तरी, सदर समितीच्या अध्यक्षानी, समितीच्या दरमहा बैठका आयोजित करुन बोगस डॉक्टरांचा शोध घेतलेल्या प्रकरणाची व त्या

प्रकरणात दोषी सापडलेल्या बोगस डॉक्टरांविरुध्द केलेल्या कारवाईबाबतची माहिती, दरमहा महिना संपल्यानंतरच्या महिन्यात १० तारखेपूर्वी शासनाला तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई याना नियमितपणे पाठवावी. तसेच सदर प्रकरणी संबंधितानी शिघ्र गतीने कारवाई करण्याची निकड विचारात घेऊन प्राथम्याने कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(टी. सी. बेंजामिन)
सचिव

प्रति,
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हा दंडाधिकारी.
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक.
सर्व उप जिल्हा पोलीस अधिक्षक (मुख्यालय).
सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
सर्व जिल्हा शल्यचिकित्सक,
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी,
सर्व जिल्हा माहिती अधिकारी,
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
सर्व सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन.
सर्व महानगरपालिका,
सर्व नगर परिषदा,
सर्व जिल्हा परिषदा,
प्रबंधक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, मुंबई.
प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन.
प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी, मुंबई.
सर्व गट विकास अधिकारी (पंचायत समिती),
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील सर्व उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी,
निवड नस्ती अधिनियम कक्ष.

-----------